महाराष्ट्र वन विभाग

महाराष्ट्र शासन
वनविभाग

# उप वनसंरक्षक, ठाणे वनविभाग यांचे कार्यालय

दूरध्वनी क्र. 022- 2542 1373 / 022- 25434349

ईमेल- dycfthane@mahaforest.gov.in dcfthane@gmail.com

मॅरेथॉन सर्कल, लाल बहादूर शास्त्री मार्ग, नौपाडा, ठाणे-400602


**पत्र** जा.क्र. कक्ष-१/२०/जमीन/ ४७८७ /२०२१-२२ दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२

प्रति,

मुख्य अभियंता, (ब्रिजेस),
बृहन्मुंबई महानगरपालिका.
इंजिनिअरिंग हब बिल्डिंग,
शुन्य मजला, डॉ. इ. मोजेस रोड,
वरळी, मुंबई-१८.

**विषय:-** श्रीकृष्णनगर दहिसर बोरीवली पूर्व येथील दहिसर नदीवरील नादुरुस्त पूलाची पूनर्बांधणी करणेकरिता सनियंत्रण समितीची मंजुरी मिळणेबाबत.

**संदर्भ :**
१) पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाकडील अधिसूचना क्र. का.आ.३६४५(अ), दिनांक ०५.१२.२०१६ व क्र. का.आ.४००४(इ), दिनांक ०५.११.२०२०
२) आपलेकडील पत्र क्रमांक Chief Engg/ 10570 /Bridges दि. २७.१२.२०२१
३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोन सनियंत्रण समितीची दिनांक १०.०२.२०२२ रोजीची बैठक.

श्रीकृष्णनगर दहिसर बोरीवली पूर्व येथील दहिसर नदीवरील नादुरुस्त पूलाची पूनर्बांधणी करणेकरिता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोन सनियंत्रण समितीची परवानगी मिळणेकरीता आपणाव्दारे संदर्भ क्र. २ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

आपल्याकडील उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखालील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोन सनियंत्रण समितीच्या दिनांक १०.०२.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली आहे.

केंद्र शासनाकडील दिनांक १४ सप्टेंबर, २००६ रोजीच्या अधिसुचनेनुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात दिनांक ०५.१२.२०१६ पूर्वी झालेली कामे, सनियंत्रण समितीचे

कार्यकक्षेत येत नाहित. त्यामुळे अशा प्रकल्पांबाबत काही समस्या उद्भवल्यास इतर कायद्यान्वये संबंधित प्राधिकृत विभागांमार्फत कार्यवाही करण्यात यावी, असे दिनांक १५.०२.२०२१ रोजीच्या बैठकीत ठरले आहे.

सदर पूलाचे बांधकामाकरिता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाचे काही वनक्षेत्र बाधित होत असल्याची बाब संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाने समितीचे निदर्शनास आणून दिली आह त्यामुळे सदर पूलाचे बांधकामाकरिता बाधित होणा-या वनक्षेत्राकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वेगळयाने केंद्र शासनाची पूर्व मान्यता घेणे आपणास बंधनकारक आहे.

वनक्षेत्रा व्यतिरिक्त संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोनमध्ये येत असलेल्या प्रस्तावीत पूलाचे बांधकाम दिनांक ०५.१२.२०१६ रोजीच्याअधिसूचनेतील परिच्छेद क्र. ४ मधील प्रपत्रातील Regulated Activities या श्रेणीमधील उपक्रम असल्याने सदर कामास समितीद्वारे सशर्त मंजुरी देण्यात येत आहे. तथापि, सदर काम करताना केंद्र शासनाकडील दिनांक १४ सप्टेंबर, २००६ रोजीच्या अधिसुचनेतील तरतूदींचा भंग होणार नाही, याची दक्षता घेऊन आपलेमार्फत पुढील संस्करण करण्यात यावे.

**सदस्य सचिव,**
**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान इको सेन्सीटीव्ह झोन**
**सनियंत्रण समिती**
**तथा**
**उप वनसंरक्षक**
**ठाणे वन विभाग, ठाणे**

प्रतिलिपी : अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका, छत्रपती शिवाजी टर्मीनस समोर,मुंबई – ४००००१ यांच्याकडे माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी : वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांच्याकडे माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी : महानगरपालिका उप आयुक्त (परि-७), बृहन्मुंबई महानगरपालिका, तिसरा मजला, आर/दक्षिण विभाग कार्यालय इमारत, महात्मा गांधी क्रॉस रोड नं. २, स.वा.प. जलतरण तलावाच्या बाजूला, कांदिवली (पश्चिम), मुंबई – ४०००६७ यांच्याकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषीत.